गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित,

## हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव

# गुरुकुल वार्तांकन

### त्रैमासिक अहवाल माहे : एप्रिल - मे - जून २०२६

**सप्रेम नमस्कार ,**

‘गुरूकुल ट्रस्ट’ च्या तीनही विभागांचा त्रैमासिक अहवाल ‘गुरूकुल वार्तांकन’ रूपाने प्रकाशित करतांना अतिशय आनंद होत आहे.

गेल्या शैक्षणिक वर्षात (२०२५-२६) गुरूकुल ट्रस्टच्या पुष्पाताई जोशी बालविकास मंदिराचा ‘पालवी’, हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालयाचा ‘गुजगोष्टी ’, तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालयाचा ‘संवाद’ असे तीन विभागांचे वेगवेगळे अंक प्रकाशित करण्यात आले. यावर्षी म्हणजेच सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात काळाचा बदल, गरज लक्षात घेऊन एकदम वार्षिक अंक प्रकाशित करण्याऐवजी, आम्ही तीनही विभागांच्या एकत्रित त्रैमासिक अहवालाचे (एप्रिल २०२६ ते जून २०२६) संगणकीय प्रकाशन (Digital Publication) करीत आहोत.

गुरूकुल ट्रस्टचे ध्येय ‘धर्म संस्थापना’ आणि उद्दिष्ट ‘नराचा नारायण’ असे आहे. त्यानुसार वाटचाल करतांना विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचे प्रतिबिंब या वार्तांकनात उमटलेले दिसते.

बदलत्या काळानुसार,तंत्रज्ञानानुसार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ व्हावा म्हणून इ.३ री पासूनच AI आधारित संगणकीय अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

गुरूकुल ट्रस्ट च्या ध्येय - धोरणांनुसार वाटचाल करतांना ‘गुरूकुल छात्र प्रबोधिनी’ उभारण्याचे उद्दिष्ट आहे.त्यासाठी खडकी शिवारात भूमिपूजन करण्यात आले आहे.

गुरूकुल ट्रस्टच्या या प्रवासात आपल्या सर्वांचेच सहकार्य आम्हाला मिळावे ही विनंती.

प्रा. ल. वि. पाठक,<br>
अध्यक्ष,<br>
गुरूकुल ट्रस्ट,चाळीसगाव.

गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित,

## हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव

# गुरुकुल वार्तांकन

### शाळा समिती

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ.राहूल अनंत कुलकर्णी | चेअरमन |
| २ | डॉ.प्रसाद शंकर पाठक | सदस्य |
| ३ | श्रीमती.सुनीता सुनील घाटे | सदस्य |
| ४ | श्री.आदित्य अजितकुमार घाटे | सदस्य |
| ५ | श्री.मंदार लक्ष्मीकांत पाठक | सदस्य |
| ६ | सौ.संगीता प्रमोद सपकाळे | मुख्याध्यापक व सचिव |
| ७ | श्री.मनोज अशोक सूर्यवंशी | शिक्षक प्रतिनिधी |

### गुरूकुल ट्रस्ट विश्वस्त मंडळ

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा.श्री.लक्ष्मीकांत विष्णू पाठक | अध्यक्ष |
| २ | डॉ.हरिश रमाकांत दवे | सचिव |
| ३ | डॉ.प्रसाद शंकर पाठक | विश्वस्त |
| ४ | डॉ.विवेक वसंतराव काटदरे | विश्वस्त |
| ५ | श्रीमती.सुनीता सुनील घाटे | विश्वस्त |
| ६ | श्री.आदित्य अजितकुमार घाटे | विश्वस्त |

Trust Regi.No : **E – 0000465 [ JAL ] Dt.19/12/1984**

PAN NO : **AAATG7721L** TAN NO : **NSKH01377E**

U/s 12 A Certificate No : **AAATG7721L25PN01**
**U/s 12AB (1) (b)**

UDISE NO : **27030500124**

गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित,


## हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव

# गुरुकुल वार्तांकन

### त्रैमासिक अहवाल माहे : एप्रिल - मे - जून २०२६




दिनांक १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सामूहिक पंचशील म्हणण्यात आले.







दिनांक ३० एप्रिल रोजी द्वितीय सत्र परीक्षेचे निकालपत्रक विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आला.यासोबत वार्षिक"गुजगोष्टी" विशेषांक देण्यात आला .





दिनांक ०१ मे रोजी "६७ वा महाराष्ट्र दिन" साजरा करण्यात आला.ज्येष्ठ शिक्षिका सौ.संध्या सुनील दर्प यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

गुरुकुल ट्रस्ट
श्रद्धावान् लभते ज्ञानम् ।
स्थापना : 1984

गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित,

## हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव

# गुरूकुल वार्तांकन

### त्रैमासिक अहवाल माहे : एप्रिल - मे - जून २०२६





दिनांक १३ मे (बुधवार) रोजी गुरूकुल ट्रस्टच्या नवीन "गुरूकुल छात्र प्रबोधिनी" शैक्षणिक संकुलाच्या इमारतीचे भूमीपूजन संस्थेचे अध्यक्ष प्रा.श्री. ल. वि. पाठक, सचिव डॉ.हरिशभाई दवे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संस्थेचे विश्वस्त मंडळ, आमंत्रित मान्यवर, शिक्षक-शिक्षकेतर वृंद, उपस्थित होते.




दिनांक ०९ जून (मंगळवार) रोजी संस्थेने “संवाद सत्राचे” आयोजन केले होते. यावेळी प्राथमिक अणि माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.संस्थेच्या सर्व शाळा विभागांचे मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.





गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित,

## हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव

# गुरुकुल वार्तांकन

### त्रैमासिक अहवाल माहे : एप्रिल - मे - जून २०२६

दिनांक १० जून रोजी मार्केटींग मार्गदर्शन,स्मार्ट बोर्ड प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन डिजीटल मार्केटींग बद्दल कु.गौरी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.श्री.यश पाठक यांनी स्मार्ट बोर्डची ओळख करून प्रात्यक्षिक दाखविले.श्री.शौर्य पवार (unite india ) यांनी कंपनीच्या School App ची माहिती दिली.






दिनांक ११ जून रोजी संस्थेने शिक्षकांसाठी "अभ्यास नाट्य कार्यशाळा"आयोजित केली.कार्यशाळेला ज्येष्ठ नाट्य प्रशिक्षक श्री.प्रकाश पारखी (पुणे) उपस्थित होते. यावेळी शिक्षकांकडून छोट्या नाटिका करून घेण्यात आलेल्या होत्या.





दिनांक १२ जून रोजी संस्थेने शिक्षकांसाठी "अभिवाचन कार्यशाळा"आयोजित केली होती.कार्यशाळेला ज्येष्ठ अभिवाचन तज्ज्ञ श्री.अशोक अडावदकर ( पुणे ) उपस्थित होते. यावेळी शिक्षकांकडून अभिवाचन करून घेण्यात आले.

गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित,

## हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव

# गुरुकुल वार्तांकन

### त्रैमासिक अहवाल माहे : एप्रिल - मे - जून २०२६






दिनांक १३ जून रोजी "माजी विद्यार्थी मेळावा"(शै.वर्ष १९९३ ते २०२३)आयोजित करण्यात आला होता.यावेळी शासन निर्देशानुसार "माजी विद्यार्थी संघ" स्थापन करण्यात आला.सौ.शर्मिला खैरनार यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.






दिनांक १५ जून रोजी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात "शाळा प्रवेशोत्सव" कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला.पहिलीत दाखल नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ व पेन्सिल देऊन करण्यात आले. यावेळी पालक उपस्थित होते.






दिनांक १६ जून रोजी शिक्षकांनी उन्हाळी सुट्टीत वाचन केलेल्या पुस्तकाबद्दल अभिप्राय सादरीकरण केले.

गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित,

## हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव

# गुरुकुल वार्तांकन

### त्रैमासिक अहवाल माहे : एप्रिल - मे - जून २०२६









दिनांक १७ व १८ जून रोजी "प्रकल्प आणि प्रतिभा विकसन कार्यशाळा"ऑनलाईन आयोजित करण्यात आली होती.श्री.नचिकेत नित्सुरे व श्री.ऋषीकेश कुलकर्णी(ज्ञान प्रबोधिनी,पुणे) यांनी या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले.





दिनांक १९ जून रोजी शिक्षण विभाग,पंचायत समिती,चाळीसगाव यांच्या वतीने "योगा दिवस पूर्व प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.प्रशिक्षणाला श्री.विनय पाटील उपस्थित होते.











"आंतरराष्ट्रीय योगा दिवस"दिवस निमित्ताने शाळेत सौ.प्रिया देशमुख(योगा प्रशिक्षक) यांनी सहज, सोपे योगासने मुलांकडून करून घेतले आणि त्यांचे महत्व सांगितले.



इ.३ री व इ.४ थी नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण (दि.२३ ते २७ जून) घेण्यासाठी श्रीमती.गायत्री पगार आणि सौ.कल्पना देशमुख यांची निवड झाली होती.